संक्षिप्त फौ. ख. क्र.५३९/२०२५
सरकार -वि.- अनिल सोलंकी
नि.क्र. ६ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - दशरथ बाळकृष्ण निकुरे,
वय ३५ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – जवळी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. दिनांक २६.०६.२०२५ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. आता मला नि.क्र.७ वरील दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावेळी माझ्यासोबत दशरथ निकुरे होता. त्यादिवशी पोलिसांनी आंभोरे यांच्या शेतावरुन अनिल सोलंकीच्या ताब्यातून दहा निपा देशी दारुच्या जप्त केल्या. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला नि.क्र.८ वरील घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला खरा व बरोबर आहे.
सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. मी रोजमजुरी करतो. मी सकाळी ९.०० वा. कामाला जातो व ५.०० वा. परत येतो. मला दारुचा शौक नाही. पोलीस मला ओळखत नाही व माझे नावं त्यांना माहीत नाही. मला पोलिसांनी आधी समन्स दिला नव्हता. हे मला माहीत नाही की, मी किती कागदावर सह्या केल्या होत्या. हे मला माहीत नाही की, मी कोणत्या तारीखेला, किती वाजता सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्या कागदावर काय लिहीले आहे हे पोलिसांनी मला वाचून दाखविले नाही व मी ही वाचून पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तो कागद कशाचा आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटील माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला कोठेही

बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील यांच्या घरी किंवा पानठेल्यावर सह्या केल्या होत्या. साक्षीदार म्हणतो मी बाहेर केल्या होत्या. पोलिसांनी मला बोलाविले नव्हते. मी माझ्या मताने कुठेही गेलो नव्हतो. मी आज पोलीस पाटील यांच्यासोबत आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीस पाटलांनी सांगितले की, कशी साक्ष द्यायची आहे. त्यामुळे मी त्याप्रमाणे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून दारु पकडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १२.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.